


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com
RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : २९९ वा गुरूवार दि १२ फेब्रुवारी २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# राष्ट्रवादीबाबत दिल्लीत मोठ्या घडामोडी; सुनेत्रा पवारांची आधी मोदी अन् नंतर अमित शाह यांच्यासोबत बैठक, कोणत्या मुद्द्यांवर चर्चा?

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली आहे. मंगळवारी रात्री उशिरा दिल्लीत दाखल झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी आज सकाळी राष्ट्रवादीचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांची भेट घेत चर्चा केली. त्यानंतर सुनेत्रा पवार यांच्यासह पार्थ पवार, जय पवार, सुनील तटकरे आणि स्वत: प्रफुल्ल पटेल यांनीही आधी पंतप्रधान मोदी आणि नंतर अमित शाह यांची भेट घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोमवारी रात्री उशिरा दिल्लीत येऊन भाजप नेतृत्वाची भेट घेऊन नंतर ते मुंबईला परतल्याची माहिती समोर आली होती. या सर्व घडामोडी, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर राज्यातील राजकीय परिस्थिती आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचे विलीनीकरण या दृष्टीने एकत्रितपणे जोडून पाहिल्या जात आहेत. सध्या राज्यसभेच्या खासदारही असलेल्या पवार मध्यंतरी घडलेल्या घडामोडीनंतर प्रथमच दिल्लीत गेल्या आहेत



अजित पवार यांच्या निधनानंतर उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतलेल्या सुनेत्रा पवार यांनी मंगळवारी पदाचा कार्यभार स्वीकारला. यावेळी सुनेत्रा पवार व त्यांचे पुत्र पार्थ यांना अश्रू अनावर झाले होते. त्या आधी त्यांनी प्रभादेवी येथील सिद्धिविनायक मंदिर येथे गणेशाचे दर्शन घेतले, तर चैत्यभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींना अभिवादन केले. मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील दालनात कार्यभार स्वीकारताना राष्ट्रवादी पक्षातील सर्व नेते उपस्थित होते. सहाव्या मजल्यावरील आपल्या दालनात सुनेत्रा पवार दाखल झाल्यानंतर वातावरण एकदम भावनिक झाले. सुनेत्रा यांनी दालनात ठेवण्यात आलेल्या अजित पवार यांच्या प्रतिमेस आदरांजली वाहिली. तसेच, उपमुख्यमंत्र्यांच्या खुर्चीत बसण्याआधी त्यांनी त्यास अभिवादन केले. त्यावेळी पार्थ पवार यांना अश्रू रोखता आले नाहीत. अजित पवार यांनी आयुष्यभर महाराष्ट्राच्या जनतेसाठी झटत विकासाचा जो ध्यास घेतला, तोच माझ्यासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ असल्याचे सुनेत्रा यांनी स्पष्ट केले.

# विदर्भातील बडा नेता अन् ती फाईल; दादांच्या अपघाताआधी काय घडलं? रोहित पवारांचा गौप्यस्फोट

**जनसंचलन/मुंबई**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर विविध शंका कुशंका घेतल्या जात असताना आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन अनेक गंभीर गोष्टी उजेडात आणल्या आहेत. विमानाची देखभाल, दुरुस्ती कधी झाली होती, त्याचा अहवाल कुठे आहेत, असे सवाल रोहित पवार यांनी उपस्थित केले. अजित पवार ज्या विमानानं प्रवास करत होते, ते व्हिएसआर कंपनीच्या मालकीचं आहे. या कंपनीत डिजीसीएचे अनेक माजी अधिकारी काम करत असल्याचा गौप्यस्फोट रोहित पवार यांनी केला. अजित पवार यांच्यासाठी २७ जानेवारीच्या संध्याकाळी सातच्या सुमारास विमान बुक करण्यात आलं. अजित पवार कारनं बारामतीला येणार होते. त्यासाठी त्यांचा ताफा सज्ज होता. देवगिरी बंगल्यावरील सीसीटीव्हीत त्यांच्या वाहनांचा ताफा दिसत असल्याचं रोहित पवार यांनी सांगितलं. २७ जानेवारीला पूर्व विदर्भातील एक बडा नेता अजित पवारांच्या भेटीला आला होता. त्यांच्या सोबत दादांची बराच वेळ चर्चा झाली. त्याला एका फाईलवर अजितदादांची सही हवी होती. पण ती फाईल मंत्रालयात होती. फाईल येईपर्यंत बराच वेळ लागला. त्यामुळे अजित पवारांना कारनं बारामतीसाठी निघता आलं नाही. यानंतर त्यांच्यासाठी विमान बुक करण्यात आलं, असं रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. अजित पवारांच्या अपघाती निधनानंतर व्हिएसआर कंपनीचे मालक समोर आले. विमानात कोणताही बिघाड नव्हता. त्याची देखभाल दुरुस्ती व्यवस्थित करण्यात आली होती. पायलटदेखील अनुभवी होता. दृश्यमानता कमी असल्यानं अपघात झाला असावा, अशी शक्यता त्यांनी बोलून दाखवली. त्यावर रोहित पवार यांनी विमान जिथे कोसळलं, त्या भागातील एका महिलेचा बाईट ऐकवला. विमानातून वेगळाच आवाज ऐकू येत होता, असं ही महिला सांगत होती. विमानाची देखभाल नीट केली होती. मग त्यातून वेगळा आवाज कसा येत होता, असा सवाल रोहित पवारांनी विचारला. बारामतीच्या धावपट्टीवर आयएलएस सिस्टिम यंत्रणा नाही. त्यामुळे विमानाला अपघात झाला असावा, असे अंदाज काही लोकांनी बांधले. पण याच कंपनीचं लियरजेट विमान २०२३ मध्ये मुंबईत कोसळलं.




त्यावेळी विमानाचे तुकडे झाले होते. मुंबईत आयएलएस सिस्टिम आहे. सगळ्या अत्याधुनिक यंत्रणा आहेत. मग तिथे व्हिएसआरच्या लियरजेटला अपघात कसा काय झाला? बाकीची सर्व विमानं त्याचवेळी अगदी सुखरुप खाली उतरत असताना यांच्याच कंपनीचं विमान कसं काय कोसळलं, अशी प्रश्नांची सरबत्ती रोहित पवारांनी केली.

# शुद्ध हवेचा हक्क



नेदरलँडमधील हेगस्थित आंतरराष्ट्रीय न्यायालयाने ( ) २३ जुलैला हवामान बदलासंदर्भात राष्ट्रांच्या जबाबदाऱ्यांबाबत एक ऐतिहासिक मत नोंदवले आहे. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने मागितलेल्या मताबद्दल निकाल देत न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की पृथ्वीच्या हवामान प्रणालीचे संरक्षण करणे ही सर्व देशांची कायदेशीर जबाबदारी आहे. महासभेने न्यायालयाला दोन मूलभूत प्रश्न विचारले होते: पहिला, हरितगृह वायूंच्या मानवनिर्मित उत्सर्जनापासून हवामान प्रणाली आणि पर्यावरणाच्या इतर बाबींचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कायद्यांतर्गत देशांच्या जबाबदाऱ्या काय आहेत? आणि दुसरा, या जबाबदाऱ्यांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर परिणाम काय असतील? या निर्णयात न्यायालयाने अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडले. प्रथम, पॅरिस करारातील सहभागी देशांनी जागतिक तापमानवाढ १.५ अंश सेल्सिअसपर्यंत मर्यादित ठेवण्यासाठी योग्य उपाययोजना करणे बंधनकारक आहे. दुसरे, प्रत्येक देशाने आपल्या राष्ट्रीय स्तरावर निश्चित केलेल्या योगदानाची () पूर्तता करणे आवश्यक आहे. न्यायालयाने हे देखील स्पष्ट केले की, हरितगृह वायूंच्या उत्सर्जनामुळे हवामान प्रणालीला होणाऱ्या हानीसाठी देश जबाबदार धरले जाऊ शकतात. जीवाश्म इंधनाचे उत्पादन, वापर, व त्याच्या उत्खननासाठी परवाने देणे किंवा अनुदान देणे यांसारख्या कृतींमुळे हवामान बदल रोखण्यात अपयश आल्यास ते आता आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन ठरू शकते. विशेष म्हणजे, न्यायालयाच्या इतिहासात केवळ पाचव्यांदाच सर्व न्यायाधीशांनी एकमताने निर्णय दिला आहे. या प्रक्रियेत तब्बल ९६ देश आणि ११ आंतरराष्ट्रीय संस्थांनी भाग घेतला, हा न्यायालयाच्या इतिहासातील सर्वाधिक सहभाग आहे. न्यायालयाच्या निकालात श्रीमंत विकसित राष्ट्रांच्या जबाबदाऱ्यांवर विशेष भर देण्यात आला आहे. च्या परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेल्या देशांवर हवामान बदलाविरुद्धच्या लढ्यात पुढाकार घेण्याची अतिरिक्त जबाबदारी आहे. विकसित देशांच्या यादीमध्ये अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, जर्मनी, ऑस्ट्रेलिया आणि इतर विकसित राष्ट्रांचा समावेश आहे, न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले की या राष्ट्रांनी केवळ आपले हरितगृह वायू उत्सर्जन मर्यादित करणेच नव्हे तर हरितगृह वायू शोषक आणि संचयकांमध्ये वाढ करणे देखील आवश्यक आहे. महत्त्वाचे म्हणजे, न्यायालयाने या श्रीमंत राष्ट्रांवर आर्थिक सहाय्य, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि क्षमता निर्माण याच्या माध्यमातून विकसनशील देशांना मदत करण्याची बंधनकारक जबाबदारीही निश्चित केली आहे. ही सर्व सहकार्ये ङ्गसद्भावनेनेफ करणे अनिवार्य आहे. केवळ कागदोपत्री आश्वासने न देता आता प्रत्यक्ष कृती करणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे ही मदत कर्जाच्या रूपात देण्याची जी प्रथा श्रीमंत देशांकडून चालू होती, त्यावरही आळा बसेल अशी आशा आहे. बेट राष्ट्रे आणि विकसनशील देशांसाठी हा निकाल विशेष महत्त्वाचा आहे. भौगोलिक परिस्थिती आणि विकासाच्या पातळीमुळे जे देश हवामान बदलाच्या दुष्परिणामांना अधिक बळी पडतात किंवा विशेषतः असुरक्षित आहेत, त्यांना इतर देशांप्रमाणेच कायदेशीर उपाय उपलब्ध असल्याचं न्यायालयाने अधोरेखित केलं. पॅसिफिक महासागरातील वानुआतु, तुवालू, किरिबाती यांसारख्या छोट्या बेट राष्ट्रांसाठी हा निकाल अक्षरशः जीवन-मरणाचा प्रश्न आहे. समुद्राच्या वाढत्या पातळीमुळे या देशांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता या राष्ट्रांना श्रीमंत औद्योगिक देशांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यासाठी आवश्यक ठोस आधार मिळाला आहे. विशेष म्हणजे, न्यायालयाने मान्य केले की या देशांनी हवामान बदलात नगण्य योगदान दिले असूनही त्यांना सर्वाधिक फटका बसत आहे. बांगलादेश, मालदीव, फिलिपाइन्स यांसारख्या विकसनशील देशांसाठी देखील हा निकाल आशेचा किरण आहे. त्यांना आता नुकसान भरपाई, आर्थिक मदत आणि तंत्रज्ञान हस्तांतरणासाठी कायदेशीर मार्ग उपलब्ध झाला आहे. महत्त्वाचे म्हणजे, न्यायालयाने स्पष्ट केले की ङ्गविशेषतः प्रभावितफ किंवा ङ्गविशेषतः असुरक्षितफ राष्ट्रांना इतर देशांप्रमाणेच समान उपाय मिळण्याचा हक्क आहे. न्यायालयाच्या निकालातील एक अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे खासगी क्षेत्रावरील राष्ट्रांच्या जबाबदारीचे स्पष्टीकरण. न्यायालयाने ठामपणे सांगितले की प्रत्येक देशाने आपल्या अधिकार क्षेत्रातील खासगी कंपन्यांच्या उत्सर्जनावर प्रभावी नियंत्रण ठेवणे कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक आहे. याचा अर्थ असा की, आता राष्ट्रे केवळ ङ्गकंपन्या स्वतंत्र आहेत,फ असे म्हणून आपली जबाबदारी टाळू शकत नाहीत. उदाहरणार्थ, जर एखाद्या देशातील तेल कंपनी, कोळसा खाण किंवा सिमेंट कारखाना मोठ्या प्रमाणात कार्बन उत्सर्जन करत असेल, तर योग्य कायदे, नियम आणि मर्यादा लागू करून हे उत्सर्जन नियंत्रित करणं ही त्या देशाची जबाबदारी असेल. न्यायालयाने स्पष्ट केले की योग्य नियंत्रक उपाययोजना न केल्यास हे राष्ट्राच्या ङ्गयोग्य काळजीफ ( ) घेण्याच्या कर्तव्यात अपयश मानले जाईल आणि त्यासाठी संबंधित राष्ट्र आंतरराष्ट्रीय स्तरावर जबाबदार धरले जाईल. या निर्णयामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांना नियंत्रित करण्यासाठी देशांवर अधिक दबाव येणार आहे आणि ङ्गकॉर्पोरेट क्लायमेट रिस्पॉन्सिबिलिटीफ ही संकल्पना अधिक बळकट होणार आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# सात जिल्हा परिषदेवर भाजपचा झेंडा

## महायुतीचा डंका! १२ जिल्हा परिषद, १२५ पंचायत समित्यांचा निकाल जाहीर..

**मुंबई :** राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समितींसाठी ७ फेब्रुवारीला मतदान पार पडले होते. ९ फेब्रुवारी रोजी या निवडणुकीची मतमोजणी पार पडली. महानगर पालिकांच्या निकालाप्रमाणेच या निवडणुकीतही महायुतीचाच डंका दिसून आला आहे. १२ पैकी ७ जिल्हा परिषदांवर भाजपचा झेंडा फडकला आहे. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना व दिवंगत अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला प्रत्येकी २ जिल्हा परिषदांवर समाधान मानावे लागले. विरोधी बाकावरील महाविकास आघाडीला अवघी एक जिल्हा परिषद मिळाली आहे.

राज्यातील १२ पैकी ७ जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपने विजय मिळवला आहे. यात सिंधुदुर्ग, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर, सातारा आणि सोलापूर या जिल्हा परिषदांचा समावेश आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने रायगड आणि रत्नागिरी या २ जिल्हा परिषदांवर भगवा फडकवला आहे. तर पुणे आणि कोल्हापूर जिल्हा परिषदेवर राष्ट्रवादीने शानदार विजय मिळवला आहे. सांगलीत शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने विजय मिळवला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांचे आतापर्यंत हाती आलेले निकाल आणि अंतिम टप्प्यातील कल लक्षात घेता, महाराष्ट्रातील जनतेने पुन्हा एकदा महायुतीवरच आपला विश्वास दाखवला आहे. १२ जिल्हा परिषदांमध्ये भारतीय जनता पार्टी



पुन्हा एकदा सर्वात मोठा पक्ष म्हणून स्थापित झाल्याचे पाहायला मिळत आहे. जवळपास ६० ठिकाणी भाजपा एक नंबरवर आहे. छत्रपती संभाजीनगर, सिंधुदुर्ग, सांगली, धाराशिव, परभणी आणि सातारा. शिवसेना दोन ठिकाणी नंबर एकवर आहे, रत्नागिरी आणि रायगड. राष्ट्रवादी काँग्रेस पुण्यामध्ये नंबर एकवर आहे. आणि जेथे तीनही पक्ष एकत्र लढले अशा कोल्हापूर आणि लातूर येथे महायुतीत नंबर एकवर आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. भारतीय जनता पक्षानेदेखील आपला २०१७ चा रेकॉर्ड देखील भाजपने मोडला आहे, २०१७ साली या जिल्हा परिषदांमध्ये भाजपला १४१ जागा होत्या, पण आत्तापर्यंत घोषित झालेल्या निकालांमध्येच २३६ जागा भाजपाला मिळाल्या आहेत, असेही फडणवीस म्हणाले.

### कोणत्या पक्षाने कोणती जिल्हा परिषद जिंकली?

- **भाजप :** सिंधुदुर्ग, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर, सातारा, सोलापूर.
- **शिवसेना एकनाथ शिंदे :** रायगड, रत्नागिरी.
- **राष्ट्रवादी :** पुणे, कोल्हापूर.
- **राष्ट्रवादी शरद पवार :** सांगली.

### पुण्यात राष्ट्रवादीचा विजय

- पुणे आणि कोल्हापूर जिल्हा परिषदेत राष्ट्रवादी सत्ता स्थापन करणार आहे. पुण्यातील ७३ पैकी ५१ जागांवर राष्ट्रवादीने दणदणीत विजय मिळवला आहे. तर भाजपला १० जागा मिळाल्या आहेत. कोल्हापूर मध्ये राष्ट्रवादीला ६८ पैकी २०, भाजपला १२ आणि शिवसेनेला ९ जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे या ठिकाणी महायुती सत्ता स्थापन करणार आहे. रायगडमध्ये शिवसेनेने ५९ पैकी २१, भाजपने १५ आणि राष्ट्रवादीने १६ जागांवर विजय मिळवला आहे. तर रत्नागिरीत ५६ पैकी ४० जागांवर शिवसेनेचा विजय झाला आहे.

### कोणत्या पक्षाला किती जागा मिळाल्या?

- सिंधुदुर्गमध्ये भाजपने ५० पैकी २७ जागा जिंकत बहुमत मिळवले आहे, तर शिवसेनेला १४ जागा मिळाल्या आहेत. या ठिकाणी शिवसेना ठाकरे गटाला ३ आणि इतरांना ६ जागा मिळाल्या आहेत. साताऱ्यात भाजपला ६५ पैकी २४ जागा मिळाल्या आहेत, तर राष्ट्रवादीला २३ आणि शिवसेनेला १५ जागा मिळाल्या आहेत. सोलापूरमध्ये भाजपला ६८ पैकी ४२ जागा मिळाल्या आहेत. तर शिवसेनेला ७ आणि राष्ट्रवादीला ९ जागा मिळाल्या आहेत.

## प्रशासकीय सुधारणांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचवावा : मुख्यमंत्री

### प्रधानमंत्री मोदी यांनी केले महाराष्ट्राचे कौतुक



**मुंबई :** राज्यातील प्रशासकीय कामकाजात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्यासाठी शासनाने 'जीपीआर २.०' हा महत्त्वाकांक्षी प्रशासकीय सुधारणा उपक्रम हाती घेतला आहे. महाराष्ट्राच्या या अभिनव उपक्रमाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विशेष कौतुक करत देशातील इतर राज्यांनाही याच धर्तीवर कार्य करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या प्रशासकीय सुधारणांचा प्रत्यक्ष लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी समन्वयाने व प्रभावीपणे काम करावे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय सुधारणांबाबत आढावा बैठक पार पडली. या बैठकीस राज्यमंत्री डॉ. पंकज भोईर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह सर्व विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव उपस्थित होते. सामान्य प्रशासन विभागामार्फत 'जीपीआर २.०' उपक्रमाच्या टप्पा एक व टप्पा दोनबाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, 'जीपीआर २.०' च्या माध्यमातून प्रशासकीय सुधारणांची तर्कशुद्ध व एकात्मिक स्वरूपात अंमलबजावणी करण्यात येत आहे. या उपक्रमाचा पहिला टप्पा यशस्वीरित्या पूर्ण झाला असून सर्व विभागांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. दुसरा टप्पा १ मे २०२६ पर्यंत पूर्ण होणार असून या सुधारणा अंमलात आल्यानंतर नागरिकांना प्रशासकीय सेवा अधिक सुलभ, जलद व पारदर्शक पद्धतीने मिळतील यासाठी सर्वंकष काम करण्याची आवश्यकता आहे.

**पाच ते दहा वर्षे या बदलांसाठी निर्णायक**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्याच्या प्रशासकीय सेवा, यंत्रणा विकास, पायाभूत सुविधा तसेच साधनसामग्री यांना भविष्याभिमुख दृष्टीने सक्षम व सुदृढ करणे अत्यावश्यक आहे. 'जीपीआर २.०' च्या माध्यमातून या दिशेने ऐतिहासिक कार्य होत आहे. आगामी पाच ते दहा वर्षे या बदलांसाठी निर्णायक ठरणार असून, त्यानंतरचा काळ या महत्त्वपूर्ण कार्यासाठी शासनाला निश्चितच लक्षात ठेवेल.

## डिजिटल फसवणुकीद्वारे हडपणे म्हणजे दरोडा

### सर्वोच्च न्यायालयाची स्पष्ट भूमिका

**नवी दिल्ली :** डिजिटल फसवणुकीद्वारे ५४,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम हडपणे हा पूर्णपणे दरोड्याचा प्रकार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी म्हटले आहे. अशा प्रकरणांना हाताळण्यासाठी आरबीआय, बँका आणि दूरसंचार विभागासारख्या भागधारकांशी सल्लामसलत करून एक मानक कार्यपद्धती (एसओपी) तयार करण्याचे निर्देश केंद्र सरकारला दिले आहेत.

भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची आणि एनव्ही अंजारिया यांच्या खंडपीठाने असे निरीक्षण नोंदवले की डिजिटल फसवणुकीद्वारे हडपलेली रक्कम अनेक लहान राज्यांच्या बजेटपेक्षा जास्त आहे. असे गुन्हे बँक अधिकाऱ्यांच्या संगनमतामुळे किंवा त्यांच्या निष्काळजीमुळे होऊ शकतात हे लक्षात घेऊन, सर्वोच्च न्यायालयाने आरबीआय आणि बँकांकडून वेळेवर कारवाई करण्याची गरज अधोरेखित केली. अनेक नवीन निर्देश जारी करताना, गृह मंत्रालयाला रिझर्व्ह बँकेच्या मानक कार्यप्रणाली आणि दूरसंचार विभागाच्या तत्सम एसओपी किंवा निर्णयांचा विचार करण्यास आणि अशा गुन्ह्यांना प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी चार आठवड्यात सामंजस्य कराराचा मसुदा तयार करण्यास सांगितले. सायबर-सक्षम फसवणूक रोखण्यासाठी बँकांनी तात्पुरते डेबिट कार्ड ठेवण्यासाठी कारवाई करण्याची सूचना देणारी एसओपी आरबीआयने तयार केली आहे, असेही खंडपीठाने नमूद केले आहे.

### चार आठवड्यांनंतर पुढील सुनावणी

- डिजिटल अटक प्रकरणांमध्ये भरपाई देण्यासाठी एक चौकट तयार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने आरबीआय, दूरसंचार विभाग आणि इतरांना संयुक्तपणे बैठक घेण्यास सांगितले. डिजिटल अटक पीडितांना भरपाई देण्यासाठी व्यावहारिक आणि उदारमतवादी दृष्टिकोन आवश्यक असल्याचे सांगितले आणि याचिका चार आठवड्यांनंतर पुढील सुनावणीसाठी ठेवली. पुढील सुनावणीच्या तारखेपूर्वी अधिकाऱ्यांना नवीन स्थिती अहवाल दाखल करण्यास सांगितले.

## परीक्षेसाठी मंत्री दादाजी भुसे यांच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा

**मुंबई :** परीक्षा म्हणजे आयुष्याच्या एका सुंदर प्रवासाची सुरुवात आहे. त्यामुळे कोणतेही दडपण न घेता उत्सवाच्या भावनेने विद्यार्थ्यांनी परीक्षेला सामोरे जावे, अशा शब्दात शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी बारावी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षा १० फेब्रुवारीपासून, तर इयत्ता दहावीच्या परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू होत आहेत. सर्व विद्यार्थी हे देशाचे भविष्य असून, प्रामाणिकपणा हीच त्यांची खरी ओळख आहे. परीक्षा हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा आणि आठवणीत राहणारा टप्पा असून, गेल्या अनेक महिन्यांपासून विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी परिश्रमपूर्वक तयारी केली आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या स्वप्नपूर्तीसाठी अहोरात्र मेहनत घेतली असून, त्या कष्टांना निश्चितच यश मिळेल, असा विश्वास मंत्री भुसे यांनी व्यक्त केला. परीक्षा देताना विद्यार्थ्यांच्या हातात केवळ उत्तरपत्रिका नसून, त्यात आई-वडिलांची स्वप्नेही असतात, असे सांगून मंत्री भुसे यांनी विद्यार्थ्यांना स्वतःवर विश्वास ठेवण्याचे, सकारात्मक विचार करण्याचे आणि कोणतेही दडपण न घेता परीक्षा देण्याचे आवाहन केले. परीक्षेच्या काळात आरोग्य जपावे, पुरेशी झोप घ्यावी, सकस आहार घ्यावा, मन शांत ठेवावे आणि परीक्षा केंद्रावर वेळेत पोहोचावे, यावरही त्यांनी भर दिला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह महाराष्ट्र शासनाच्या वतीने विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा देताना, कष्टाने, जिद्दीने आणि पालक-शिक्षकांच्या आशीर्वादाने विद्यार्थी स्वतःबरोबरच राज्याचे नाव उज्ज्वल करतील, असा विश्वासही मंत्री दादाजी भुसे यांनी व्यक्त केला.

# तीन वर्षांचं रिलेशनशीप मोडलं, गर्लफ्रेण्डने लग्नाची पत्रिका-साडी दाखवली, बॉयफ्रेण्डने मृत्यूला कवटाळलं

**बंगळुरु :** तीन वर्षांचं रिलेशनशीप, लग्न करण्याचं स्वप्न आणि व्हॅलेंटाईन्स डे एकत्र साजरा करण्याचा प्लॅन.. या तिन्ही गोष्टी एकत्रच भंगल्या. आपला साखरपुडा झाल्याचं सांगत तरुणीने त्याला थेट लग्नाची पत्रिका दाखवली. त्यामुळे व्यथित झालेला २६ वर्षीय जिम ट्रेनर-बॉडीबिल्डर किरण याने आयुष्याची अखेर केली. कर्नाटकातील बंगळुरुमध्ये ही धक्कादायक घटना घडल्याचे समोर आले आहे.

बंगळुरुत राहणारा २६ वर्षांचा किरण तीन वर्षांपासून एका तरुणीसोबत रिलेशनशीपमध्ये होता. तिच्यासोबत लग्न करुन सेटल होण्याचं स्वप्नही त्याने पाहिलं होतं. व्हॅलेंटाईन्स डेच्या निमित्ताने १४ फेब्रुवारी रोजी तिला छानसं सरप्राईज गिफ्ट देण्याचाही किरणचा प्लॅन होता. मात्र किरणला उलट सरप्राईज मिळालं, जेव्हा गर्लफ्रेण्डने त्याला आपलं लग्न ठरल्याचं सांगितलं.






माझा एका मुलासोबत साखरपुडा झालाय, आम्ही लग्न करतोय, लग्नाची तयारी झालेय, असं सांगत गर्लफ्रेण्डने किरणला लग्नाची पत्रिका आणि साडीही दाखवली, याचा किरणला मोठा मानसिक धक्का बसला. यानंतर किरण अस्वस्थ झाल्याचं त्याच्या कुटुंबीयांनी सांगितलं. गर्लफ्रेण्डशी बोलून झाल्यानंतर किरण घरी आला. त्याने स्वतःला आपल्या खोलीत बंद करुन घेतलं. त्यानंतर गळफास घेऊन आयुष्याची अखेर केली. बराच वेळ होऊनही किरण बाहेर येत नसल्याने कुटुंबीयांनी दरवाजा ठोठावला. आतून प्रतिसाद मिळाल्याने जबरदस्ती दार तोडलं असता, आत किरण लटकलेल्या अवस्थेत पाहायला मिळाला. त्याला तातडीने व्हिक्टोरिया रुग्णालयात नेलं असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं.

संबंधित तरुणीवर ५० लाख रुपयांच्या कर्जाचा डोंगर आहे. किरणने कर्ज फेडण्यास मदत करण्याचं वचन दिलं होतं. त्यानुसार किरणकडून तिने काही पैसेही घेतले, मात्र गेल्या आठवड्यात दुसऱ्याच तरुणासोबत तिने साखरपुडाउरकला, असा आरोप किरणच्या कुटुंबाने केला आहे. पोलिसांनी या प्रकरणी तिच्याविरोधात तक्रार दाखल करुन घेतली असून अधिक तपासानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

## दिराचं लग्न ठरल्याने वहिनी नाराज ; नैराश्यात आयुष्य संपवलं, परिसरात खळबळ

**इटावा :** उत्तर प्रदेशच्या इटावा जिल्ह्यातील अहिबरनपुरा गावात दिराचं लग्न ठरल्याने वहिनीने आयुष्य संपवल्याची घटना समोर आली आहे. दिराचं लग्न ठरल्याने वहिनी नाराज होती. नाराज वहिनीने दिराच्या लग्नाच्या दोन दिवस आधी खोलीत गळफास घेत आत्महत्या केली. वहिनीच्या मृत्यूने लग्न घरावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



मृत महिलेच्या पतीने सांगितलं की, 'पत्नी पुष्पा देवी आणि लहान भावामध्ये अनैतिक संबंध होते. दोघांची जवळीक वाढल्याने लहान भावाला दुसऱ्या शहरात कामाला पाठवलं होतं. मी पत्नीसोबत वेगळ्या घरात राहत होतो'. 'पुष्पा देवी ही दोन मुलांची आई आहे. १० वर्ष आणि दुसरा ७ वर्षांची दोन मुले आहेत. यानंतरही पुष्पा देवीचे दिराशी अनैतिक संबंध सुरू होते. त्यात दिराचं लग्न ठरल्याने गेल्या काही दिवसांपासून नाराज होती, असे पुढे सांगितले. पुष्पा देवी दिर गावात आल्याने त्याला भेटायला गेली होती. त्यावेळी दोघांमध्ये कडाक्याचं भांडण झालं. त्यानंतर घरी आली. घरातील एका खोलीत आयुष्य संपवलं.

शेर सिंह आणि पुष्पा यांचं लग्न २०११ साली झालं होतं. शेर सिंह दुसऱ्या शहरात कामाला होता. आत्महत्या केलेल्या पुष्पा देवीचा मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. पोलिसांनी या प्रकरणी पुढील कारवाईला सुरुवात केली आहे. पुष्पा देवीच्या मृत्यूने गावात खळबळ उडाली आहे. या घटनेने लग्न घरावर शोककळा पसरली आहे. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला आहे. तिच्या नातेवाईकांचे जबाब नोंदवण्याचे काम सुरू आहे. आत्महत्येमागे नेमकं काय कारण आहे, याचा सखोल तपास केला जात आहे. महिलेच्या शवविच्छेदन अहवालानंतरच पुढील कारवाई निश्चित होणार आहे. पुष्पा देवीच्या मृत्यूने नातेवाईकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

## संसदेसह नऊ शाळांना बॉम्बने उडवण्याची धमकी

**नवी दिल्ली :** संसदेसोबतच राजधानी दिल्लीमधील नऊ शाळांमध्ये बॉम्बस्फोट घडवून आणण्याची धमकी देण्यात आली आहे. सोमवारी सकाळी धमकी संदर्भातील मेल प्राप्त झाला आहे, या मेलमुळे मोठी खळबळ उडाली आहे.


१३ फेब्रुवारी रोजी दुपारी १.११ मिनिटांनी संसदेमध्ये मोठा स्फोट होईल, दिल्लीला आम्ही खलिस्तान बनवू, अशा अशायाचा मजकूर असलेला मेल प्राप्त झाला आहे. या मेलमध्ये दहशतवादी अफजल गुरु आणि पंजाबला खलिस्तान बनवण्याचा देखील उल्लेख आहे. दरम्यान, हा मेल प्राप्त होताच या मेलमध्ये ज्या शाळांची नावे आहेत, त्या शाळांच्या सुरक्षेमध्ये मोठी वाढ करण्यात आली आहे. दिल्ली फायर सर्व्हिसने सांगितले की, सोमवारी सकाळी दिल्लीतील वेगवेगळ्या भागात असलेल्या शाळांकडून आम्हाला इमरजेन्सी कॉल आला, त्यानंतर खबरदारी म्हणून आम्ही बॉम्ब शोधक पथक आणि डॉग स्कॉडसह या शाळांमध्ये दाखल झालो. आतापर्यंत ९ शाळांनी बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाली आहे.

## १००० रुपयांत बायकोला विकलं, जंगलात नेलं ; नवऱ्याच्या मित्रांनी केला सामूहिक बलात्कार

**इटावा :** उत्तर प्रदेशमध्ये एका तरुणाने आपल्या बायकोला १००० रुपयांमध्ये मित्रांना विकलं. नवरा -बायकोच्या पवित्र नात्याला काळीमा फासणारी ही घटना उत्तर प्रदेश्या बदायू जिल्ह्यातील एका गावात घडली. नवऱ्याने बायकोला विकल्यानंतर आरोपी नराधमांनी तिला जंगलात नेले आणि त्याठिकाणी तिच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात आला.

घडलं असं की, आरोपीने आपल्या बायकोला मित्रांच्या दुचाकीवर बसवले होते. नवऱ्यावर विश्वास ठेवून ही महिला दुचाकीवर बसली. आरोपींनी दुचाकी महिलेच्या घराकडे नेण्याऐवजी सालवा जंगलाच्या दिशेने नेली. आरोपींनी महिलेला जंगलात देऊन तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. बेशुद्धावस्थेत आरोपी महिलेला तिथेच सोडून निघून गेले. शुद्धीवर आल्यानंतर महिला घरी आली.

महिलेने घरी आल्यानंतर तिच्या नवऱ्याला घडलेल्या घटनेविषयी सांगितले तेव्हा तिला कळाले की तिच्या नवऱ्यानेच हे षडयंत्र रचले होते. नवऱ्यानेच आरोपींकडून १००० रुपये घेत तिला




त्यांच्यासोबत पाठवले होते. या घटनेनंतर महिलेला मोठा धक्का बसला. तिने तिच्या कुटुंबीयांना घटनेची माहिती दिली. त्यानंतर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन आरोपी नवरा बदन सिंग आणि त्याच्या साथीदारांविरोधात गुन्हा दाखल केला. या घटनेनंतर आरोपी नवरा आणि त्याचे मित्र घटनास्थळावरून पळून गेले. पोलिस सध्या आरोपींचा शोध घेत आहेत. या घटनेमुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. आरोपीला कठोर शिक्षा देण्यात यावी अशी मागणी केली. या घटनेमुळे उत्तर प्रदेशमध्ये खळबळ उडाली.

# मुलाच्या लग्नाची तयारी रंगलेली, वरमाईवर काळाचा घाला, मुंबईतील राहत्या घरात होरपळून मृत्यू, दिव्यामुळे गादी पेटल्याची भीती

**मुंबई :** विलेपार्ले येथील एका बहुमजली इमारतीच्या शेवटच्या मजल्यावर सोमवारी आग लागली. यात एका वयोवृद्ध महिलेचा मृत्यू झाला, तर दुसरी महिला जखमी झाली आहे. या आगीमागील नेमके कारण स्पष्ट झालेले नाही. मात्र मुलाच्या लग्नाच्या आदल्या दिवशी घडलेल्या दुर्घटनेने कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

विलेपार्ले पूर्वेला फिरोज शाह मेहता मार्गावरील 'सुविधा पर्ल' या १३ मजली इमारतीच्या शेवटच्या मजल्यावरील घरात सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास अचानक ही आग लागली. अग्निशमन दलाने ती लेव्हल-१ प्रकारातील घोषित




करून विझविण्याचे प्रयत्न सुरू केले.

आगीवर दुपारी १२.४५ वाजताच्या सुमारास नियंत्रण मिळवण्यात यश आले. मात्र, या दुर्घटनेत भावना सात्रा (६२) आणि अनेरी सात्रा (३४) या महिला जखमी झाल्या. त्यांना तत्काळ नानावटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. जखमींपैकी भावना यांचा मृत्यू झाला, तर गंभीररित्या जखमी झालेल्या अनेरी यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरु आहेत. या आगीमुळे फ्लॅट क्रमांक १३०१ आणि १३०२ मधील विद्युत वायर, घरगुती साहित्य, फर्निचर, कपडे, एसी आदी साहित्य भस्मसात झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. भावना सात्रा यांचे पती रिअल इस्टेट डेव्हलपर आहेत. आगीचे नेमके कारण स्पष्ट नाही, परंतु शेजारी आणि प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, भावना यांच्या मुलाचे घटनेच्या दुसऱ्या दिवशी - मंगळवारी लग्न होते. त्यामुळे लग्नाच्या विधींसाठी देवघरात दिवा लावण्यात आला होता आणि कदाचित जवळच असलेल्या गादीने पहिल्यांदा पेट घेतल्यामुळे आग लागली असावी.

घटनेच्या वेळी दोघीच जणी घरात होत्या, तर इतर कुटुंबीय टेरेसवर लग्नाच्या विधींची तयारी करत होते. आग लागल्याचं समजताच अग्निशमन यंत्रणांना लगेच माहिती देण्यात आली. फायर ब्रिगेड तातडीने घटनास्थळी पोहोचले आणि दोघींना बाहेर काढण्यात आलं, परंतु रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच भावना यांना मृत घोषित करण्यात आलं, तर अनेरी सहा टक्के भाजल्या आहेत.

# स्कॉटलंडचा स्पर्धेतील पहिला विजय

## इटलीचा ७३ धावांनी पराभव : सामनावीर मायकेल लीस्क, १७ धावांत ४ बळी




**कोलकाता/वृत्तसंस्था :** आयसीसीच्या टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील येथे सोमवारी खेळिवण्यात आलेल्या क गटातील सामन्यात जॉर्ज मुन्सेचे दमदार अर्धशतक तसेच 'सामनावीर' मायकेल लिस्कच्या अचुक गोलंदाजीच्या जोरावर स्कॉटलंडने इटलीचा ७३ धावांनी पराभव केला. या स्पर्धेत पहिल्यांदा सहभागी झालेल्या इटलीला हार पत्करावी लागली. आता क गटात विंडीज, स्कॉटलंड आणि इंग्लंड यानी गुणतत्यात अनुक्रमे पहिली ३ स्थाने मिळिवली आहे. स्कॉटलंडने २ सामने खेळले असून विंडीज आणि इंग्लंड यांनी प्रत्येकी १ सामना खेळला आहे.

या सामन्यात इटलीने नाणेफेक जिंकून स्कॉटलंडला प्रथम फलंदाजी दिली. स्कॉटलंडने २० षटकात ४ बाद २०७ धावा जमविल्या. त्यानंतर इटलीचा डाव १६.४ षटकात १३४ धावात आटोपला.

स्कॉटलंडच्या डावाला जॉर्ज मुन्से आणि मायकल जोन्स यानी दमदार सुरूवात करून देताना सलामीच्या गड्यासाठी ८३ चेंडूत १२६ धावांची भागीदारी केली. मुन्सेने ५४ चेंडूत २ षटकार आणि १३ चौकारासह ८४, जोन्सने ३० चेंडूत २ षटकार आणि १ चौकारासह ३७ धावा जमविल्या. कर्णधार बेरिंग्टनने ११ चेंडूत २ चौकारासह १५ धावा जमविताना मॅकमुलेन समवेत ३ गड्यासाठी ४८ धावांची भागीदारी केली. मॅकमुलनने १८ चेंडूत ४ षटकारासह नाबाद ४१ धावा जमविल्या. मायकेल लिस्कने ५ चेंडूत २ षटकार आणि २ चौकारासह नाबाद २२ धावा झोडपल्या. स्कॉटलंडच्या डावात १० षटकार आणि १८ चौकार नोंदविले गेले. इटलीतर्फे अली हसन, स्टीवर्ट, ड्रेका, स्मुट्स यानी प्रत्येकी १ गडी बाद केला. स्कॉटलंडने पॉवरप्ले दरम्यानच्या ६ षटकात ४९ धावा जमविल्या. मुन्सेने ३० चेंडूत १ षटकार आणि ९ चौकारासह अर्धशतक पूर्ण केले. प्रत्युत्तरादाखल खेळताना इटलीच्या डावामध्ये बेन मॅनेंटीने ३१ चेंडूत १ षटकार आणि ५ चौकारासह ५२, हॅरी मॅनेंटीने २५ चेंडूत ३ षटकार आणि १ चौकारासह ३७, स्मुट्सने ११ चेंडूत २ षटकार आणि २ चौकारासह २२ तर मोसेकाने १२ चेंडूत १ षटकार आणि १ चौकारासह १३ धावा जमविल्या. कर्णधार मॅडिसन दुखापतीमुळे फलंदाजी करू शकला नाही. इटलीच्या डावात ७ षटकार आणि ९ चौकार नोंदविले गेले. स्कॉटलंडतर्फे मायकेल लिस्कने १७ धावात ४ तर वॅटने २ धावात २ तसेच ब्रॅड क्युरी, व्हील आणि डेव्हीडसन यानी प्रत्येकी १ गडीबाद केला. इटलीने पॉवरप्ले दरम्यानच्या ६ षटकात ५४ धावा जमविताना ३ गडी गमविले. मॅनेंटीने अर्धशतक २९ चेंडूत १ षटकार आणि ५ चौकारासह पूर्ण केले.

**संक्षिप्त धावफलक :** स्कॉटलंड २० षटकात ४ बाद २०७ (मुन्से ८४, मॅकमुलेन नाबाद ४१, जोन्स ३७, बेरींग्टन १५, मायकेल लिस्क नाबाद २२, अलि हसन, स्टीवर्ट, ड्रेका, स्मुट्स प्रत्येकी १ बळी). इटली १६.४ षटकात सर्वबाद १३४ (बेन मॅनेंटी ५२, हॅरी मॅनेंटी ३७, स्मुट्स २२, ए मोसेका १३, मायकेल लिस्क ४-१७, वॅट २-२४, क्युरी, व्हील व डेव्हीडन्स प्रत्येकी १ बळी.).

## बहिष्कारावर पंतप्रधान घेणार निर्णय

**इस्लामाबाद :** कोलंबो येथे १५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक स्पर्धेतील भारताविऊद्धच्या सामन्यावर पाकिस्तान बहिष्कार टाकणार की नाही यावर पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ अंतिम निर्णय घेतील, असे जिओ न्यूजने सोमवारी वृत्त दिले आहे. पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे (पीसीबी) अध्यक्ष मोहसिन नक्वी सोमवारी शरीफ यांना भेटण्याची आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) शिष्टमंडळासोबतच्या बैठकीची त्यांना माहिती देण्याची शक्यता आहे.

उपाध्यक्ष इम्रान ख्वाजा यांच्या नेतृत्वाखालील आयसीसी शिष्टमंडळ, पीसीबी अध्यक्ष मोहसिन नक्वी आणि बीसीबी अध्यक्ष अमिनुल इस्लाम यांच्यात रविवारी लाहोर येथे बैठक होऊन १५ फेब्रुवारी रोजीच्या भारताविऊद्धच्या सामन्यावर बहिष्कार टाकण्याच्या पाकिस्तानच्या निर्णयावर चर्चा झाली. पाकिस्तानी माध्यमांनी दिलेल्या वृत्तांनुसार, प्रदीर्घ वाटाघाटी संपल्या आहेत. पुढील काही तासांत परस्पर सल्लामसलतीद्वारे वाद सोडवला जाईल आणि इम्रान ख्वाजा, मोहसिन नक्वी आणि अमीन उल इस्लाम यांच्यात रुपरेषा निश्चित झाली आहे.

पाकिस्तान सरकारच्या अधिकृत एक्स हँडलने भारताविरुद्धच्या सामन्यात पाक संघ उतरणार नाही अशी घोषणा केली होती आणि नंतर पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी या बहिष्काराचा संबंध बांगलादेशशी झालेल्या वादाशी जोडला होता आणि हे पाऊल म्हणजे एकतेचे प्रतीक असल्याचे सांगितले होते. दरम्यान, सदस्य सहभाग करारानुसार (एमपीए) फोर्स मॅज्युअर कलम लागू करण्यासाठी त्यांनी काय प्रयत्न आहेत हे दाखविण्यास आयसीसीने पीसीबीला सांगितले आहे. विशेष म्हणजे आयसीसीला पीसीबीकडून एक ईमेल प्राप्त झाला होता, ज्यामध्ये सरकारी आदेशांमुळे वादग्रस्त बहिष्कार टाकण्यात आल्याचे नमूद केले होते आणि सदर ईमेल स्पर्धा सुरू होण्याच्या १० दिवस आधी आला होता. सामना न झाल्यास आयसीसीला होणाऱ्या संभाव्य नुकसानाची माहिती आयसीसीने पीसीबीला दिली आहे.

## दक्षिण आफ्रिकेचा कॅनडावर सफाईदार विजय

**अहमदाबाद/वृत्तसंस्था :** कर्णधार एडन मार्करमचे शानदार अर्धशतक आणि लुंगी एन्गिडीच्या भेदक माऱ्याच्या बळावर दक्षिण आफ्रिकेने गट ड मधील सामन्यात कॅनडाचा ५७ धावांनी पराभव करून पहिला विजय मिळिवला. ३१ धावात ४ बळी टिपणाऱ्या एन्गिडीला सामनावीराचा बहुमान मिळाला.

कॅनडाकडून प्रथम फलंदाजी मिळाल्यावर द.आफ्रिकेने २० षटकात ४ बाद २१३ धावा फटकावल्या. त्यानंतर कॅनडाला ८ बाद १५६ धावांवर रोखत विजय साकार केला. मार्करमने जोरदार फटकेबाजी करीत ३२ चेंडूत ५९ धावा फटकावल्या. त्यात १० चौकार व एका षटकाराचा समावेश होता. रेयान रिकेल्टन (२१ चेंडूत ३३), क्विन्टन डी कॉक (२२ चेंडूत २५), ट्रिस्टन स्टब्स (१९ चेंडूत नाबाद ३४) व डेव्हिड मिलर (२३ चेंडूत नाबाद ३९) यांनीही उपयुक्त योगदान दिल्याने द.आफ्रिकेला दोनशेचा टप्पा पार करता आला. कॅनडाचा स्पिनर अंश पटेलने ३१ धावांत ३ बळी मिळिवले तर



दिलप्रीत बजवाने एक बळी टिपला.

मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना कर्णधार दिलप्रीत बजवा पहिल्याच चेंडूवर बाद झाला. युवराज सामराने ८ चेंडूत १२ धावा केल्यानंतर निकोलस कर्टनही लगेचच बाद झाल्यानंतर त्यांची स्थिती ३ बाद २६ अशी झाली. १९ धावांची भर पडल्यानंतर श्रेयस मोवाही ९ धावा काढून बाद झाला. नवनीत धलिवाल व हर्ष ठाकर (२९ चेंडूत ३३) यांनी थोडाफार डाव सावरताना पाचव्या गड्यासाठी ६१ धावांची भागीदारी केली. धलिवालने ४१ चेंडूत ७ चौकार, एका षटकारासह ६४ धावांचे योगदान दिले. पण मार्को जॅन्सेनने १८ व्या षटकात लागोपाठ दोन बळी मिळिवले. आवश्यक धावगती वाढली असल्याने कॅनडाच्या तळाच्या फलंदाजांना ती राखता आली नाही. त्यांना ८ बाद १५६ धावांपर्यंतच मजल मारता आली. जॅन्सेनने ३० धावांत २ बळी टिपले तर रबाडा व बॉश यांनी एकेक बळी मिळिवले. द.आफ्रिकेच्या डावात मार्करम व डी कॉक यांनी प्रारंभापासूनच आक्रमक फटकेबाजी सुरू केली. या दोघांनी ६.५ षटकांतच ७० धावांची भागीदारी केली. बजवाने डी कॉकचा त्रिफळा उडवून ही भागीदारी संपुष्टात आणली. मार्करमने नंतर बजवाला चौकार ठोकत २८ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. अंश पटेलने त्याची खेळी संपुष्टात आणली. रिकेल्टनही आक्रमक मूडमध्ये दिसत होता. पण ३३ धावा फटकावत तोही तंबूत परतला. देवाल्ड ब्रेविस ६ धावांवर बाद झाल्यानंतर मिलर व स्टब्स यांनी जोरदार फटकेबाजी करीत पाचव्या गड्यासाठी ३७ चेंडूत अभेद्य ७५ धावांची भागीदारी करीत संघाला दोनशेपारचा टप्पाही गाठून दिला.

# झिम्बाब्वेची ओमानवर ८ गड्यांनी एकतर्फी मात

## सामनावीर मुझाराबानी, एन्गारावा, इव्हान्स यांचा भेदक मारा, बेनेटच्या नाबाद ४८ धावा




**कोलंबो/वृत्तसंस्था :** ब्रायन बेनेटने मोठ्या व्यासपीठावर आपला दर्जा दाखवून देत नोंदवलेल्या ३६ चेंडूतील ४८ धावा आणि गोलंदाजांनी केलेल्या शानदार कामगिरीमुळे झिम्बाब्वेने टी-२० विश्वचषक स्पर्धेत विजयी सुरुवात करताना ओमानवर ८ गड्यांनी विजय मिळिवला. १६ धावांत ३ बळी मिळिवणाऱ्या ब्लेसिंग मुझाराबानीला सामनावीराचा बहुमान मिळाला.

झिम्बाब्वेने ओमानला फलंदाजी दिल्यावर ब्लेसिंग मुझाराबानीने नव्या चेंडूवर झिम्बाब्वेला दणक्यात सुरुवात करून दिली. त्याने रिचर्ड एन्गारावाची चांगली साथ मिळाल्यानंतर ओमानचा डाव १९.५ षटकांत केवळ १०३ धावांत गुंडाळला. मुझाराबानीने तीन तर एन्गारावानेही १७ धावांत ३ बळी मिळिवले. त्यांना पेसर ब्रॅड इव्हान्सने १८ धावांत ३ बळी घेत पूरक साथ दिली. सातव्या षटकातच ओमानची स्थिती ५ बाद २७ अशी झाली तेव्हा ते शंभरच्या आत बाद होतील असे वाटले होते. विनायक शुक्ला (२५) व सुफियान मेहमूद (२८), नदीम खान (२०) यांनी थोडाफार प्रतिकार केल्याने ओमानला शंभरी पार करता आली. त्यानंतर तडिवनाशे मरुमनी (११ चेंडूत २१) व बेनेट यांनी झिम्बाब्वेला जोरदार सुरुवात करून देताना १९ चेंडूत ३० धावांची सलामी दिली. मरुमनीचा वसीम अलीने अप्रतिम झेल घेत त्याला बाद केले. याच षटकात सुफियानने डायन मेयर्सला शून्यावर बाद केले.

बेनेटने नंतर अनुभवी यष्टिरक्षक ब्रेन्डन टेलरसमवेत (३० चेंडूत ३१ धावा करून निवृत्त) तिसऱ्या गड्यासाठी ६८ धावांची भागीदारी करीत १३.३ षटकांत झिम्बाब्वेचा विजय साकार केला. २२ वर्षीय बेनेटने स्पर्धेआधी तीन अर्धशतके व एक शतक नोंदवत झिम्बाब्वेला या स्पर्धेत स्थान मिळवून दिले होते. हाच फॉर्म त्याने कायम ठेवला आहे. झिम्बाब्वेचा पुढील सामना १३ रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध तर ओमानचा सामना १२ रोजी लंकेविरुद्ध होणार आहे.

# 'क्रांतिज्योती विद्यालय मराठी...' ला मिळाले घवघवीत यश; सीक्वलची घोषणा



**मुंबई :** हेमंत ढोमे दिग्दर्शित 'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम' चित्रपट आणि सिनेमातील गाणी सोशल मीडियावर तुफान गाजत आहे. हा चित्रपट १ जानेवारी २०२६ला रिलीज झाला. चित्रपटात मराठी शाळा आणि मराठी भाषेबद्दलचे मत, विचार मांडले आहेत. ज्यामुळे चित्रपटाने महाराष्ट्रातील प्रेक्षकांचे भरपूर प्रेम मिळवले आहे. थिएटर हाऊसफुल पाहायला मिळत आहेत.

'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम' या चित्रपटाला प्रेक्षकांकडून भरपूर प्रेम मिळाले. चित्रपटाने देखील बॉक्स ऑफिसवर बंपर कमाई केली आहे. आता 'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम' चित्रपटाच्या घवघवीत यशानंतर चित्रपटाचे दिग्दर्शक आणि निर्माति हेमंत ढोमे आणि क्षिती जोग यांनी चाहत्यांना आनंदाची बातमी दिली आहे.

नुकतीच 'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम' चित्रपटाच्या यशाची जल्लोष साजरा करण्यात आला. या पार्टीला अनेक कलाकारांनी उपस्थिती लावली. ज्याचे व्हिडीओ आणि फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहेत. या सोहळ्यात हेमंत ढोमे आणि क्षिती जोग यांनी 'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम' चित्रपटाचा दुसरा भाग येणार असल्याची घोषणा केली. ज्यामुळे प्रेक्षकांना प्रचंड आनंद झाला आहे. तसेच हेमंत आणि क्षितीने चाहत्यांना डबल सरप्राइज दिले आहे.

हेमंत ढोमे आणि क्षिती जोग यांनी सुपरहिट 'झिम्मा' फ्रँचायझीचा पुढचा भाग म्हणजे 'झिम्मा ३ 'ची देखील घोषणा केली आहे. 'झिम्मा' आणि 'झिम्मा २ ' ला प्रेक्षकांनी भरपूर प्रेम दिले आहे. आता हे दोन्ही चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत. मात्र अद्याप कोणत्याही चित्रपटाची रिलीज डेट समोर आली नाही.

'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम' चित्रपटात तगडे कलाकार पाहायला मिळत आहेत. यात सचिन खेडेकर, अमेय वाघ, सिद्धार्थ चांदेकर, पुष्कराज चिरपुटकर, हरीश दुधाडे, कादंबरी कदम, क्षिती जोग, निर्मिती सावंत आणि प्राजक्ता कोळी हे झळकले आहेत.

## 'धुरंधर'च्या यशानंतर सौम्याला मिळाली मोठी संधी

**मुंबई :** सौम्या टंडन ही अभिनेत्री यापूर्वी 'भाभी जी घर पर हैं'मुळे लोकप्रिय झाली होती. परंतु तिला जगभरात प्रसिद्धी मिळवून देण्याचे श्रेय धुरंधर या चित्रपटाचे आहे. या चित्रपटात तिची भूमिका छोटी परंतु दमदार होती. चित्रपटात रहमान डकैतला थप्पड लगावतानाच्या दृश्यामुळे सौम्या ही सोशल मीडियावर व्हायरल झाली होती. लोकांनी तिच्या भूमिकेचे कौतुक केले आणि याचाच परिणाम म्हणजे अभिनेत्रीला आणखी एक मोठा चित्रपट मिळाला आहे.

सूरज बडजात्या यांच्या 'ये प्रेम मोल लिया' या चित्रपटात सौम्या दिसून येणर आहे. या चित्रपटाद्वारे सूरज बडजात्या हे स्वत:च्या रोमँटिक जॉनरच्या दिशेने वापसी करत आहेत. ये प्रेम मोल लिया या चित्रपटात आयुष्मान खुराना आणि शर्वरी वाघ मुख्य भूमिकेत आहे. यातील सौम्याची भूमिका कोणत्याप्रकारची असेल




हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. सौम्याने स्वत:ची कारकीर्द टीव्ही मालिका 'ऐसा देस है मेरा'द्वारे सुरू केली होती. यानंतर तिने 'मेरी आवाज को मिल गई रोशनी', 'डान्स इंडिया डान्स' समवेत अनेक शोमध्ये होस्टिंग अनब अभिनय केला होता. सौम्याला खरी लोकप्रियता ही भाभी जी घर पर है मालिकेने मिळवून दिली. सौम्याने जब वी मेट या चित्रपटातील छोट्या भूमिकेद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण केले होते.

## ओमकार राऊतने बिग बॉसच्या घराला केले टाटा, बाय बाय

**पुणे :** बिग बॉस मराठी ६' चा पाचवा आठवडा सुरू झाला आहे. चौथ्या आठवड्यात ९ सदस्य नॉमिनेट झाले होते. यात आयुष संजीव, सचिन कुमावत, दिपाली सय्यद, ओमकार राऊत, दिव्या शिंदे, रोशन भजनकर, अनुश्री माने, राकेश बापट आणि प्रभू शेळके यांचा समावेश होता. चौथ्या आठवड्यात घरातून दोन सदस्य नॉमिनेट झाले. घरातील सदस्यांना धमकी दिल्यामुळे दिव्या शिंदेला घरातून बाहेर काढण्यात आले. तर चौथ्या आठवड्यात कमी मत मिळाल्यामुळे ओमकार राऊतला घराचा निरोप घ्यावा लागला. 'बिग बॉस मराठी ६'च्या घरात ओमकार राऊत आणि विशाल कोटियनने एकत्र एन्ट्री घेतली होती. 'मेहनतीचं दार' निवडून ओमकार राऊतने घरात प्रवेश केला होता. ओमकार राऊत हा उत्तम हेअर स्टायलिस्ट आहे. तो एक फिटनेस आयकॉन म्हणूनही ओळखला जातो.

## 'देवखेळ' सीरिजचे होतेय कौतुक

**मुंबई :** झी५ची मराठी ओरिजन सीरिज 'देवखेळ'चे सध्या कौतुक होत आहे. कोकणातील फारशा ऐकिवात नसलेल्या लोककथांपासून प्रेरित देवखेळ एक गहन मानसशास्त्रीय थरारपट आहे. ही सीरिज ३० जानेवारीपासून झी५ वर स्ट्रीम झाली आहे. देवखेळ एका थरारक रहस्यावर आधारित आहे. दरवेळी होळी पौर्णिमेच्या रात्री एखाद्याचा मृत्यू होतो, हे मृत्यू न्यायाचे प्रतीक म्हणून स्थानिक पातळीवर पूजल्या जाणाऱ्या शंकासुर या पौराणिक लोककथा व्यक्तिरेखेने दिलेल्या दैवी शिक्षेची कृत्यं आहेत असा ग्रामस्थांचा विश्वास आहे. भीती ही शांततेला अधोरेखित करते आणि सत्य विधीत दडलेले असते. पोलीस अधिकारी विश्वास सरंजामे गावात येतो, तेव्हा तो अंधविश्वासाला स्पष्टीकरण म्हणून स्वीकारण्यास नकार देतो. ही कटानुसार केलेली हत्या असल्याचे त्याचे मत असते आणि तो तपास सुरू करतो.



या सीरिजमध्ये पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत अंकुश चौधरी असून प्राजक्ता माळी, यतीन कार्येकर, अरुण नलावडे, वीणा जामकर आणि मंगेश देसाई यांच्या प्रमुख भूमिका पहायला मिळाल्या आहेत. या सीरिजचे दिग्दर्शन चंद्रकांत लता गायकवाड यांनी केले आहे.


देवखेळ हा विश्वास आणि तर्क यांच्यातील संघर्ष आहे, विश्वास सरंजामे हा तर्कशास्त्र, पुरावे आणि कायद्यात खोलवर रुतलेला माणूस आहे, तरीही त्याला जिथे भीती, श्रद्धा आणि शतकानुशतके जुन्या अंधश्रद्धा लोकांच्या निवडी ठरवतात, अशा ठिकाणी काम करण्यास भाग पाडले जाते. कोकणातील वातावरण, शंकासुराची पौराणिक कथा आणि मानसिक तणाव या सीरिजला अविश्वसनीय हटके स्वरुप देत असल्याचे अंकुश चौधरीने म्हटले आहे.

## इन्फ्लुएंसरची आत्महत्या, भाड्याच्या घरात आढळला मृतदेह

**मुंबई :** सोशल मीडियाच्या जगातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. प्रसिद्ध सोशल मीडिया इन्फ्लुएंसर चिन्नू पप्पू हिचे ९ फेब्रुवारी रोजी निधन झाले. २४ व्या वर्षी तिने अखेरचा श्वास घेतला. तिचा मृतदेह भाड्याच्या अपार्टमेंटमध्ये सापडला. घरात तिचा मृतदेह फाशीला लटकलेला आढळला. तिला ताबडतोब रुग्णालयात नेण्यात आले, परंतु तपासणीनंतर डॉक्टरांनी चिन्नू पप्पूला मृत घोषित केले.

चिन्नू ही कासारगोडमधील अडूरची रहिवासी होती. प्राथमिक माहितीनुसार, हा प्रकार आत्महत्या असल्याचे बोले जात आहे. ही घटना दुपारी घडली. चिन्नू पप्पूचे खरे नाव रेश्मा असे होते. तिला सोशल मीडियावर चिन्नू पप्पू म्हणून ओळखले जात होते. ती भाड्याच्या घरात राहत होती. तिचा मृतदेह अपार्टमेंटच्या एका खोलीत फाशीला लटकलेला आढळला. चिन्नू ही गंगाधरन आणि शैलजा यांची मुलगी होती. ती सोशल मीडियावर खूप सक्रिय होती. तिचा मोठा चाहता वर्ग होता. रेश्मा तिच्या मातृभाषेत व्हिडीओ बनवून लोकप्रिय झाली होती. तिचे व्हिडीओ खूप व्हायरल देखील झाले आहेत. ती फूड ब्लॉगिंग देखील करायची. त्यामुळे तिच्या अशा अचानक जाण्याने चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. तिच्या मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मिळालेल्या माहितीनुसार असे बोले जाते की, तिचे लग्न झाले होते. परंतु सुमारे एक महिन्यापूर्वी तिचा घटस्फोट झाला होता. तिचे चार वर्षाचे मुल सध्या अदूर येथे रेश्माच्या पालकांसोबत राहत आहे. मात्र कोणतीही अधिकृत माहिती नाही.

शेजाऱ्यांनी ताबडतोब रेश्माला वाचवण्यासाठी जवळच्या रुग्णालयात नेले, परंतु तेथील डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. दुपारी २ वाजताच्या सुमारास पोलिसांनी तिच्या पालकांना ही दुःखद बातमी कळवली. पोलीस आता या घटनेचा तपास घेत आहे. तिच्या घटस्फोटाचा याच्याशी संबंध लावला जात आहे. तिच्या अचानक मृत्यूमुळे त्याचे कुटुंब आणि चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. अनेकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून तिला श्रद्धांजली वाहिली आहे.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!


# तुती लागवडीसाठी शेतकऱ्यांनी ५ मार्चपर्यंत नोंदणी करावी

**जनसंचलन/बुलडाणा**

जिल्ह्यात नवीन तुती लागवड करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांची नोंदणी ५ मार्च २०२६ पर्यंत करण्यात येणार आहे. यासाठी ङ्गआपले सरकारफ पोर्टलवर वस्त्रोद्योग विभाग निवडून ऑनलाईन नोंदणी अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्यात तुती लागवडीद्वारे रेशीम कोष उत्पादनाला अनुकूल वातावरण असून, या उद्योगात सातत्याने वाढ होत आहे. तुती लागवडीमुळे शेतकऱ्यांना भरघोस उत्पन्न मिळत असून, एक एकर क्षेत्रातून दुसऱ्या वर्षापासून दोन लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न मिळत असल्याचे दिसून येत आहे.रेशीम कोष उत्पादनाच्या वाढत्या प्रमाणामुळे जालना, बीड, बडनेरा, सोलापूर, बारामती व नागपूर येथे कोष बाजारपेठा सुरू करण्यात आल्या आहेत. शासनाचे शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे धोरण रेशीम उद्योगाद्वारे साध्य होत असल्याचे चित्र आहे.महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी १ एकर तुती लागवड, जोपासना व कीटक संगोपन गृहासाठी तीन वर्षांत एकूण ८९५ मनुष्य-दिवसांची मजुरी दिली जाते. यामध्ये मजुरीपोटी रु. २ लाख ७९ हजार २४० व साहित्यासाठी रु. १ लाख ५३ हजार असे एकूण ४ लाख ३२ हजार २४० अनुदान देण्यात येते.केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र-२ योजनेअंतर्गत तुती लागवडीसाठी प्रति एकर ५४ हजार, सिंचन संचासाठी प्रति एकर ५४ हजार, कीटक संगोपन गृहासाठी २ लाख ४३ हजार ७५०, संगोपन साहित्यसाठी ३७ हजार ५००, व निर्जतुकीकरण औषधांसाठी ३ हजार ७५० असे एकूण ३ लाख ७५ हजार अनुदान उपलब्ध आहे. बहुभूधारक शेतकऱ्यांना या योजनेतून २ एकर तुती लागवड करता येऊन एकूण ५ लाख ६२ हजार ५०० अनुदान दिले जाते. कृषी विभागाच्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना (पोकरा) अंतर्गत तुती लागवडीसाठी ४५ हजार, रेशीम कीटक संगोपन गृहासाठी २ लाख ४३ हजार ७५० व संगोपन साहित्यासाठी ३६ हजार ३७५ असे एकूण ३ लाख २५ हजार १२५ अनुदान देण्यात येते. बुलढाणा जिल्ह्यातील ३१० गावांमध्ये पोकरा योजना लागू असून, इच्छुक शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे ऑनलाईन अर्ज करावा. मनरेगा व सिल्क समग्र-२ योजनेसाठी नोंदणी व मार्गदर्शनासाठी शेतकऱ्यांनी जिल्हा रेशीम कार्यालय, बुलढाणा (भोंडे हॉस्पिटल समोर, मुठ्ठे लेआऊट, धाड रोड) येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा रेशीम विकास अधिकारी श्री. विजय ठाकरे यांनी केले आहे.

# कुसुम अभियानाचा सखोल आढावा

**जनसंचलन/बुलढाणा**

सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग), पुणे कार्यालयाचे मा. वैद्यकीय अधिकारी डॉ. उत्तम कांबळे यांनी बुलढाणा जिल्ह्याचा विशेष दौरा करून ङ्गकुसुम कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र अभियानफ तसेच आरोग्य विभागाच्या विविध राष्ट्रीय कार्यक्रमांचा आढावा घेतला. दौऱ्यादरम्यान डॉ. कांबळे यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या विविध आरोग्य उपक्रमांची सविस्तर माहिती त्यांनी जाणून घेतली. त्यानंतर सहाय्यक संचालक, कुष्ठरोग कार्यालय येथे कुसुम अभियानाचा सखोल आढावा घेऊन संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी बुलढाणा बसस्थानक येथे उभारण्यात आलेल्या कुसुम जनजागृती स्टॉलला भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. जनजागृती उपक्रमांबद्दल समाधान व्यक्त करत त्यांनी या प्रयत्नांचे कौतुक केले. पुढे जिल्हा क्षयरोग कार्यालयास भेट देऊन राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमाची पाहणीही त्यांनी केली. या प्रसंगी डॉ. के. व्ही. राठोड (सहाय्यक संचालक, कुष्ठरोग), वैद्यकीय सहाय्यक तिटकारे, मदणे, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी, सांख्यिकी अधिकारी तसेच कुष्ठरोग कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी आणि राज्यस्तरीय पथक उपस्थित होते.

# वैदुवाडी जि. प. शाळेतील कथित बोगस विद्यार्थी व अनुदान घोटाळा उघड; चौकशी अहवाल नुसार कारवाई करा

## जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अनभिज्ञ की त्यांची डोळेझाक?

**जनसंचलन/ चिखली**

पंचायत समिती चिखली अंतर्गत जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा, वैदुवाडी, मुख्याध्यापक यांनी शाळेत बोगस विद्यार्थी दाखवून शासनाचे अनुदानात भ्रष्टाचार केल्या प्रकरणी तात्काळ गुन्हे दाखल करणे तसेच रामेश्वर गणपत मिसाळ मुख्याध्यापक वैदुवाडी शाळेत शालेय कामकाजामध्ये अनियमितता केल्याप्रकरणी गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती चिखली यांनी सादर केलेल्या अहवालानुसार तात्काळ निलंबनाची कारवाई करणे तसेच मुख्याध्यापक जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा, वैदुवाडी यांनी त्यांच्या सेवाकाळात अनेक अर्जित रजा, आजारी रजा, घेवून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान केल्याप्रकरणी त्यांना वैद्यकिय मंडळापुढे शारिरीक तपासणीसाठी हजर करणे या सर्व विषयी चे तक्रार निवेदन जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक यांना भारतीय मानवाधिकार संघटनेचे जिल्हा अध्यक्ष प्रशांत डोंगरदिवे यांनी देऊन कारवाई ची मागणी केली आहे. सविस्तर असे की माहिती अधिकारातून प्राप्त माहितीनुसार चिखली पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा, वैदुवाडी येथे गंभीर स्वरूपाच्या अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे सदर घोळ हा दाबण्यात आला आहे की जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी या प्रकरणी डोळेझाक करीत आहेत यावर प्रश्नचिन्हे उभे राहिले आहे. शाळेतील घटलेली विद्यार्थी पटसंख्या व पालकांनी मुलांना अन्य शाळेत हलविल्याच्या पार्श्वभूमीवर, यापूर्वी मुख्यकार्यकारी अधिकारी खरात यांनी १० पेक्षा कमी विद्यार्थी पटसंख्या असलेल्या शाळांतील शिक्षकांना शैक्षणिक कामकाज असमाधानकारक ठरवून निलंबित करण्याचा ठोस निर्णय घेतला होता. या निर्णयाची संपूर्ण शासनस्तरावर प्रशंसा झाली होती. असे असतानाच वैदुवाडी येथील जि. प. शाळेत नव्याने रुजू झालेले मुख्याध्यापक रामेश्वर गणपत मिसाळ यांनी वर्ग १ ते ४ साठी कागदोपत्री ८ विद्यार्थी दाखवले; मात्र प्रत्यक्षात हे विद्यार्थी शाळेत उपस्थित नसल्याचे उघड झाले आहे. संबंधित विद्यार्थी हे नियमितपणे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, शेळगाव आटोळ येथे शिक्षण घेत असल्याचा आरोप आहे. प्रत्यक्ष शाळेत नसलेल्या विद्यार्थ्यांच्या नावावर गणवेश, बूट-सॉक्स, शालेय पोषण आहार व पुस्तके यांची अनुदाने उचलून, वाटप झाल्याचे दाखवून आर्थिक गैरव्यवहार केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. ही बाब काही वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाल्यानंतर गठित चौकशी समितीने केलेल्या तपासणीत स्पष्ट झाल्याचे सांगण्यात येते. चौकशी अधिकारी यांनी दि. ०२/०१/२०२६ रोजी अहवाल गटशिक्षणाधिकारी प स चिखली यांच्याकडे सादर केला होता. त्यानंतर गटशिक्षणाधिकारी यांनी संपूर्ण चौकशी अहवालासह मिसाळ यांना दोषी धरून शालेय कामकाजातील अनियमिततेचा अहवाल दि. ०५/०१/२०२६ रोजी मा. शिक्षणाधिकारी (प्राथ.), जि. प. बुलढाणा यांच्याकडे सादर केला असल्याचे नमूद आहे. मात्र, शिक्षणाधिकारी विकास पाटील यांनी हा चौकशी अहवाल मा. मुख्यकार्यकारी अधिकारी खरात यांच्याकडे सादर न करता आर्थिक देवाणघेवाण करून प्रकरण दाबल्याची चर्चा चिखली परिसरात सुरू असल्याचा आरोप तक्रारदारांकडून करण्यात आला आहे.

# जि.प. शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात; स्वयंपाक खोलीचे उद्घाटन, माजी विद्यार्थ्यांचा हातभार



**जनसंचलन/ डोणगाव**

येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या जल्लोषात पार पडले. शिक्षणासोबत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सभापती राजेंद्र पाटील पळसकर होते, तर उद्घाटन जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष शैलेश सावजी यांच्या हस्ते झाले. प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फ ुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. मुख्याध्यापिका वर्षाताई लांभाडे यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा घेत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी राबविलेल्या उपक्रमांची माहिती दिली. यावेळी नवनिर्मित स्वयंपाक खोलीचे उद्घाटन भाजप महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. ज्योती बुरखंडे यांच्या हस्ते करण्यात आले. विशेष म्हणजे, माजी विद्यार्थ्यांनी शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त करत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, खेळणी व खाऊचे वाटप केले. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर व सामाजिक संदेश देणाऱ्या नृत्यांनी उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल डोंगरदिवे यांनी केले. शिक्षकवृंदाच्या परिश्रमामुळे कार्यक्रम यशस्वी ठरल्याची भावना मान्यवरांनी व्यक्त केली.

# परीक्षेला निघाला पण मृत्यूने गाठलं!

## चिखलीत भीषण अपघाताने संताप

जनसंचलन/ चिखली



मालगणी फाटा येथे आज सकाळी सुमारे ९.३० वाजता झालेल्या भीषण अपघातात एकलारा येथील २१ वर्षीय शंतनू नारायण अंभोरे यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. परीक्षा देण्यासाठी दुचाकीवरून बुलढाण्याकडे जात असताना भरधाव ट्रकने दुचाकीस्वाराला चिरडल्याने ही धक्कादायक घटना घडली. अपघातानंतर परिसरात काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत करत पोलिसांना माहिती दिली. मात्र ट्रकच्या धडकेत तरुणाचा घटनास्थळीच मृत्यू झाल्याने संतापाची लाट उसळली आहे. मालगणी फाटा परिसरात वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे हा रस्ता मृत्यूचा सापळाफ ठरत असल्याची तीव्र प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली आहे. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालय चिखली येथे पाठविण्यात आला असून पुढील तपास चिखली पोलीस करत आहेत. पोलिसांनी ट्रक चालकाला ताब्यात घेतले आहे.

# ताठे सरकार (पाटील) इज बॅक!

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक क्षेत्रात कायम चर्चेत राहिलेले नाव म्हणजे राजेश ताठे उर्फ ताठे सरकार शासकीय नोकरीला रामराम ठोकून समाजसेवेच्या वाटेवर उतरलेल्या ताठे सरकारांनी आता पुन्हा एकदा जोरदार एंट्री केल्याची चर्चा रंगली आहे. लोकांशी थेट संपर्क, आक्रमक भूमिका आणि वेगळ्या शैलीमुळे त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली असून ङ्ढसरकारफ्फ ही पदवी देखील त्यांना जनतेनेच दिली आहे. मागील काही दिवसांपासून सोशल मीडियावर त्यांचा एक व्हिडिओ प्रचंड व्हायरल होत आहे. प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देतानाच त्यांनी जिल्ह्यातील प्रश्नांवर भाष्य केले आणि आगामी राजकीय वाटचालीचे संकेत दिले. यानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असून ताठे सरकार बुलढाणा लोकसभा मतदारसंघातून मोठी राजकीय खेळी करण्याच्या तयारीत असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. विश्वासू कार्यकर्त्यांमार्फत जिल्ह्यात मोर्चेबांधणी सुरू झाल्याचे बोलले जात असून विविध भागांत संपर्क वाढविण्यावर भर दिला जात आहे. मराठा (पाटील) समाजासह सर्वसामान्यांशी असलेले घट्ट संबंध आणि आक्रमक शैलीमुळे येणाऱ्या २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत ते थेट रिंगणात उतरणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. दरम्यान, ताठे सरकारांच्या या हालचालींमुळे बुलढाणा जिल्ह्याच्या राजकारणात नवे समीकरण तयार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आगामी काळात ते नेमकी कोणती भूमिका घेतात, कोणत्या पक्षासोबत जातात किंवा स्वतंत्र लढत देतात याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा


फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


# पोषणमूल्यांनी समृद्ध राळा पिकास

## राज्यात चालना

जनसंचलन/बुलढाणा

राज्यातील बदलत्या हवामान परिस्थितीमुळे पारंपरिक पिकांच्या उत्पादनावर परिणाम होत असताना, राळा (नाचणी) हे पोषक तृणधान्य शेतकऱ्यांसाठी आशेचे पीक ठरत आहे. कमी पावसात, हलक्या जमिनीत तसेच डोंगराळ भागातही तग धरू शकणारे राळा पीक शाश्वत शेतीच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जात आहे. महाराष्ट्र शासनाने २०२३ पासून पोषक तृणधान्यांच्या उत्पादन व वापरास प्रोत्साहन देण्यासाठी विशेष धोरण आखले आहे. त्याअंतर्गत राळा, ज्वारी, बाजरी यांसारख्या पिकांच्या लागवडीवर भर देण्यात येत असून, रागीला सुपर फूड म्हणून मान्यता मिळत आहे. राळ्यामध्ये कॅल्शियमचे प्रमाण अत्यंत जास्त असल्याने लहान मुले, गरोदर महिला, वृद्ध तसेच रक्तक्षय व मधुमेह असलेल्या रुग्णांसाठी हा आहार उपयुक्त ठरत आहे.


दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८